**रयत शिक्षण संस्थचे**

**छत्रपती शिवजी कॉलेज,सातारा**

**माजी विद्यार्थी समिती**

**Report of Significant finiancial and non financial contribution of Alumni Association:2018-19**

रयत शिक्षण संस्थेच्या ४ आक्टोबर २०१८ ते २०१९ या शताब्दी वर्षात छत्रपती शिवाजी कॉलेज माजी विद्यार्थी संघाची स्थापना ४ अक्टोबर २०१८ रोजी करण्यात आली.महाविद्यालयाच्या जडणघडणीमध्ये व उज्वल यशामध्ये माजी विद्यार्थी संघाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.रयत शिक्षण संस्थेच्या शताब्दी वर्षानिमित्त छत्रपती शिवाजी कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा दि. ६-१० २०१८ रोजी मा,प्राचार्य आर.डी गायकवाड यांच्या अध्यक्षेतेखाली आयोजित करण्यात आला होता.सदर मेळाव्यास १५० पेक्षा अधिक माजी विद्यार्थी उपस्थितीत होते.या मेळाव्यात खालील माजी विद्यार्थ्यांनी व माजी विद्यार्थी मेळाव्यास उपस्थित सहकारी प्राध्यापकांनी देणगी जाहीर केली व महाविद्यालयास दिली.

| **अ.नं.** | **माजी विद्यार्थ्याचे नाव** | **देणगी रुपये** |
|---|---|---|
| १ | प्राचार्य आर डी गायकवाड. | २५०००/- |
| २ | प्राचार्य बी.जे शेवाळे | २५०००/ |
| ३ | प्रा.डॉ.एस.जी मेनकुदळे | २५०००/ |
| ४ | प्रा.एस एस मेनकुदळे | २५०००/ |
| ५ | डॉ.प्रभाकर शिंदे | ५०००/- |
| ६ | प्रा.सौ.साधना पाटील | २१०००/- |

सदर बैठकीत महाविद्यालयास A+ मानांकन मिळाल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भाऊसाहेब कराळे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक व आजी माजी विद्यार्थांचे अभिनंदन करण्यात आले.

माजी विद्यार्थी संघाची स्थापना झाल्यानंतर संघाच्या कार्यकारी मंडळाची बैठक /सभा शनिवार दिनांक २३.२.२०१९ रोजी संघाचे अध्यक्ष प्राचार्य, आर.डी.गायकवाड यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाली. माजी विद्यार्थी संघ,कार्यकारी मंडळ सर्व पदाधिकारी व सदस्य यांनी सभेच्या सुरुवातीस दि.२०.२.२०१९ रोजी काश्मीरमध्ये पुलवामा येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेले भारतीय जवानांना श्रद्धांजली अर्पण केली.माजी व विद्यार्थी समिती चेअरमन प्रा.डॉ.भोसले एस.एम. यांनी सभेचे प्रास्ताविक केले. संघाचे सचिव प्रा.डॉ.ए.जी.निमसे यांनी कार्यकारिणी सदस्यांचे विशेष योगदानाबद्दल सत्काराचे निवेदन करून अध्यक्षांच्या हस्ते मा.रामशेठ ठाकूर - यांनी महाविद्यालयास ४ कोटी १३ लाख बजेट असणारी इमारत बांधून देणार आहेत सध्या त्याचे बांधकाम चालू आहे. तसेच त्यांनी कॉलेजच्या इतर कामासाठी लाखो रुपये देणगी दिल्याबद्दल सत्कार केला.

संघाचे अध्यक्ष प्राचार्य, आर.डी.गायकवाड यांनी महाविद्यालयास रू.२५०००/- देणगी दिल्याबद्दल मा.प्राचार्य बी.के.कराळे यांनी सत्कार केला. तसेच अध्यक्षांच्या हस्ते मा.बी.जे.शेवाळे रू.२५०००/- देणगी दिली त्यांचे अभिनंदन करण्यात आले.प्रा.एस.टी.भुजबळ यांनी १ लाख रू.चे कॉलेज गेट (प्रवेशद्वार) तयार करून दिले.सिद्धी विनायक ट्रस्ट, मुंबई यांचेकडून १४००००/-रुपये किमतीची क्रमिक पुस्तके उपलब्ध करुन

दिली आणि लोकवर्गणी स्वरूपात १,१००००/-देणगी महाविद्यालयास मिळवून दिली. त्याबद्दल सत्कार करण्यात आला.

सत्काकारानंतर सचिव प्रा.डॉ.ए.जी.निमसे यांनी महाविद्यालयाच्या गौरवास्पद बाबींचा उल्लेख करून छत्रपती शिवाजी कॉलेज माजी विद्यार्थी संघ सातारा स्थापनेचा आढावा सभेपुढे मांडला. दि.४.१०.२०१८ रोजीचे रीतसर धर्मादाय आयुक्त कार्यालय, सातारा यांचेकडून संघ स्थापनेचे नोंदणीप्रमाणपत्र मिळाल्याचे सांगितले. छ.शिवाजी कॉलेज सातारा यास २०१७-१८ मध्ये –NAAC बेंगलोर समिती कडून **A**+ मानांकन, Autonomous College Status, RUSA Grant व ClusterUniversity मध्ये या कॉलेजचा समावेश या गौरवास्पद कार्याबद्दल मा.प्राचार्य बी.के.कराळे यांचा अभिनंदनचा ठराव घेण्यात आला.संघाचे भविष्यकालीन कार्याचे नियोजन करणे त्यामध्ये महाविद्यालयात असणारी कमवा व शिका योजनेमध्ये विद्यार्थी संख्या कमी होत आहे व प्रवेशानंतर कांही दिवसात विद्यार्थी सदर योजना सोडून जातात. त्याची कारणे शोधून संघामार्फत अंमलबजावणी काय करता येईल त्यावर चर्चा करण्यात आली व त्यामधून खालील उपाय असे ठरले.

१.सदर योजनेत गरजू विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा २.प्रवेशवेळी घेण्यात येणाऱ्या मुलाखती पालकासमवेत योग्य निकष ठरवून गोडोली बागेत शेतात घेण्यात याव्यात.३.मुलाखातीवेळी माजी विद्यार्थी संघातील सदस्यांचे सहकार्य घेण्यात यावे असे ठरले.४.विद्यार्थ्यांना कमवा व शिका व रयत संस्कृती समजण्यासाठी वसतिगृहात महिन्यातून एकदा कमवा व शिका माजी विद्यार्थ्यांचे प्रबोधनपर व्याख्यान घेण्यात यावे.५.अनेक कोर्समध्ये विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देऊन सहभागी करून घेणे.६.विद्यार्थ्यांना उत्तम सुविधा असाव्यात.७.सदर योजनेत कॉलेजकडे किती विद्यार्थ्यांची निवास व्यवस्था सोय आहे व कामाचे स्वरूप लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात यावा.जास्तीत जास्त विद्यार्थी घ्यावेत.८.माजी विद्यार्थी संघ मेळावा सध्याच्या कमवा व शिका योजनेतील विद्यार्थ्यांबरोबर ९ मे रोजी आयोजित करावा असे ठरले.९.माजी विद्यार्थी संघ कार्यकारणी आजी विद्यार्थ्यांना माहिती होण्यासाठी दरवर्षी प्रकाशित होणाऱ्या शिवविजय मध्ये छापण्यात यावी असे ठरविण्यात आले.१०.पारंपारिक शेतीतील कामापेक्षा नाविन्यपूर्ण व कौशल्यावर आधारीत कामे महाविद्यालयातच विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देण्यात यावीत असे ठरले.११.सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्र यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे.१२.भविष्यकालीन कार्य संघाच्या ध्येय धोरणानुसार करण्यात यावे.१३.आजी विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान माजी विद्यार्थ्यांचे सहकार्य घेऊन आयोजित करावे.१४.रयत शिक्षण संस्थचे माजी चेअरमन प्रा.डॉ.एन.डी.पाटील यांनी सभेत कांही महत्वपूर्ण सूचना व मार्गदर्शन केले.

मा.अध्यक्ष्यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या विषयावर खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.

१.संघाचे सामान्य सभासद फॉर्म भरून घेणे.२.संघासाठी आवश्यक दफ्तर - खरेदी (कीर्द, खतावणी, प्रोसिडिंग बुक, लेटर हेड, शिक्के तयार करणे) असे ठरले.३.राष्ट्रीयकृत बँक मध्ये संघाचे खाते ओपनकरण्यात यावे असे ठरले.

सभेच्या शेवटी प्रा.एस.टी.भुजबळ यांनी उपस्थितांचे आभार मानले व अध्यक्षांच्या परवानगीने सभेची सांगत करण्यात आली.

**प्रा.डॉ.एस.एम. भोसले**
चेअरमन, माजी विद्यार्थी समिती
छत्रपती शिवजी कॉलेज,सातारा